भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र .८०६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/१२/२०१७

**१) धार्मीक भावना दुखावल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ७/१२/२०१७ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी नरेंद्र प्रल्हाद वंजारी वय ४७ वर्ष रा. आयुध निर्माणी जवाहरनगर हा त्याचे कर्मचाऱ्या सोबत आयुध निर्माण इंडस्ट्रीयल कॅन्टीन मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धम्म महापरीनीर्वाण दिना निमीत्त असलेल्या श्रध्दांजली कार्यक्रमात उपस्थीत असल्याने, फिर्यादी व त्याचे कर्मचाऱ्यासह डयुटीवर जाण्यास उशीर झाला असे सांगीतले असता, यातील आरोपीने फिर्यादीस व त्याचे सहकार्यास मेरा प्रोडक्शन बाबा आगे करेगा क्या? मै किसी बाबा आबा को नही जानता यावर फिर्यादीने बाबासाहेब महान व्यक्ती है! उन्होने देश का सविधान लिखा है! असे म्हटल्यावर आरोपीने मुझे ये सब मत समझाओ मेरा कोई कुछ नही बिघाड सकता, असे हेतु परस्पर द्वेश बुध्दीने बौध्द धर्मीयाचे दैवत असलेल्या बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरूध्द अपशब्द व अपमान जनक शब्द वापरल्याने व धार्मीक भावना दुखावल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर कलम २९५(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. नेवारे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक ०६/१२/२०१७ चे २१.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी यांनी दारू पाणी पिवुन नशेत चुर होवुन फिर्यादीस व मोहल्यातील लोकांना अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व एमएलसी. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ कलम २९४,५०६,३४ भादवी. सहकलम १८५(१) मदाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत

**३) बोलेरो पिकअप गाडीच्या धडकेत तिन जखमी :–**

दिनांक ७/१२/२०१७ चे ०९.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी त्याचे मामा किशोर मेश्राम आणी मामी किरण यांचेसह मोटार सायकल क्र. एमएच ३१ डी जी ७४२१ नी भिवापुर येथुन पवनीकडे डाव्या बाजुला विरूध्द दिशेने येणाऱ्या एक पांढऱ्या रंगाचा डग्गा (बोलेरो पिकअप) एमएच ३६ एफ १५७१ चे चालकाने भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकलला समोरून ठोस मारून पळुन गेल्याने त्यामुळे फिर्यादी जखमी आणी फिर्यादीचा मामा किशोर मेश्राम, आणी मामी किरण हे गंभिर जखमी झाल्याने फिर्यादी सौ. ममता सुरज चौधरी वय १८ वर्ष रा. ताज कॉलोनी भिवापुर हिचे बयाण व एमएलसी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४,१३४,१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत

**४) निष्काळजीपणे वाहन चालवुन इसमास गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक ६/१२/२०१७ चे १८.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा मित्र किशोर हटवार रा. पवनी हा भुयार येथुन त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ आर ५४८५ ने येत असता पवनी कडुन जाणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन किशोर हटवार याला धडक मारून गंभिर जखमी केल्याने, फिर्यादी कैलास बावणकर वय ३४ वर्ष रा.शनीवारी वार्ड पवनी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९, ३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. इळपाते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत

५) काठीने मारून जखमी करून जिवेमारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:—

दिनांक ०६/१२/२०१७ चे २१.०० वाजता यातील आरोपी हा फिर्यादीचा मुलगा संजय याचे दुकानातील टेबल फेकत असतांना फिर्यादीने टेबल फेकु नको असे म्हटले असता आरोपीने बाजुला ठेवलेल्या काळया मधुन एक झीलपी उचलुन फिर्यादीचे डोक्यावर मारून जखमी केले तेव्हा, मुलगा संजय भांडण सोडवीण्यास गेला असता त्याला हाताबुक्यानी मारपीट केली व शिवीगाळ करून पुढे जिवेमारण्याची धमकी दिल्याने हरीचंद्र लोडवाजी तुमसरे वय ६५ वर्ष रा. खापा यांचे तोंडी रिपोर्ट वरू पोलीस स्टेशन तुमसर कलम ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा माहुरले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

६) बालकामगार प्रमिबंधक अधीनियमा वरून गुन्हा नोंद:—

दिनांक ०६/११/२०१७ चे १४.२० वाजता यातील जिल्हा बाल कामगार कृतीदल धाडपथक भंडारा यांनी दिव्यकलश मिनरल अॅन्ड मेन्टन्स वडद येथे धाड टाकुन एका बाल कामगार याला ताब्यात घेवुन त्याचे मालक विनुदर केशवराव शेंडे रा. जमनापुर साकोली यांचेवर बाल कामगार प्रतिबंधक अधिनियमा वरून फिर्यादी विशाख व्ही बनकर वय ४३ वर्ष रा. सहकारी कामगार अधीकारी तुमसर यांचे कागदपत्राा वरून पोलीस स्टेशन साकोली कलम ३(अ) बाल कामगार प्रमीबंधक अधी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चांदेवार पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत

७) अचानक प्रकृती खराब होवुन इसमाचा मृत्यु :—

दिनांक ०७/१२/२०१७ चे ६.०० वाजता दरम्यान यातील मृतक बिरंदर रनसिंग यादव वय ४५ वर्ष रा. खेडापाटोडा त+जि. झज्जर ह.मु. शिवाजी वार्ड शुक्रवारी वार्ड भंडारा याची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सा.रू. भंडारा येथे आकस्मीक विभागात नेले असता डॉ. नी तपासुन मृत घोषीत केल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. डोंगरे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

८) मृत अवस्थेत इसमाचा प्रेत मिळुन आल्याने गुन्हा नोंद:—

दिनांक ०७/१२/२०१७ चे ६.३० वाजता दरम्यान यातील स्टेशन डायरी सान्हा क्र. ११/१७ मधील नोंद नुसार पोलीस पाटील निलज फोन द्वारे माहीती पो.स्टे.ला दिली की, एक अनोळखी इसम मौजा निलज येथील बसस्थानक येथे मृत्यु पावला आहे. सदर माहीतीवर डयुटी ऑफीसर पोना. बिसने ब.न. ६६२ पोशी. दयालवार ब.न. १४०० हे सहानिशा करण्याकामी घटनास्थळी जावुन सहानिशा होताच मृतक नामदेव मोहुरले वय ८० वर्ष रा. तळोदी जा. नागभीड जि. चंद्रपुर हा १० ते १२ वर्ष पासुन मौजा निलज येथे राहत आहे, त्यास आजार असल्याचे फिर्यादी विठ्ठल नामदेव मसरूम वय ७० वर्ष रा. गांधी वार्ड निलज यांचे तोंडी रिपोर्ट मध्ये नमुद असल्याने मृतक हा आजाराने मरण पावल्याने पो.स्टे. पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.ना. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

९) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ०७/१२/२०१७ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील बोलेरो मॅक्स गाडी ही ऑटो ही जुना बसस्थनक येथे आमरोडवर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. तिवाडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. तिवाडे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**१०) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०७/१२/२०१७ चे १७.३० ते १८.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन ही रेल्वे फाटक जवळ आंबेडकर वार्ड वरठी येथे आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. पंचबुधे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. पंचबुधे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**११) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०७/१२/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील महिद्रा मॅक्स वाहन ही देव्हाडा बुज येथे आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. गौतम यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गौतम पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**१२) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक ०७/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, वरठी, साकोली, व पालांदुर येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हातभट्टी दारू किंमती ६,००/–रु. व ५ लिटर ७६० मिलीलीटर देशी दारू किमती १६४६/रु तसेच जुगारातुन किमती २६२५ रु असा एकुन ४८७१/रु चा माल जप्त करण्यात आला.

**१३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०७/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०६ तीन सिटर वाहनांवरती १८ केसेस व ईतर वाहनांवरती ९८ केसेस करण्यात आलेले आहे.


**(मपोउपनी. प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२**


प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.